**नियमित दिवाणी मुकदमा नंबर २९७/२०२३ मधील निशाणी क्र.४४ खालील आदेश**

(गौरी शशिकांत कदम + १ विरुध्द परशुराम केशव कदम + ६)

(CNR No.MHST130009502023)

प्रतिवादी क्रमांक ७ ने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ७, नियम ११ (अ)(ड) प्रमाणे दाखल केला आहे. सदर अर्जावर वादीने नि. क्र. ५१ वर म्हणणे देवून आक्षेप घेतलेला आहे.

**प्रतिवादी क्रमांक ७ चे थोडक्यात कथने खालीलप्रमाणे –**

०२. प्रतिवादी क्रमांक ७ ही राष्ट्रीयीकृत बँक असून, स्थापना बँकिंग कंपनीज ॲक्वीझीशन ॲन्ड ट्रान्सफर ऑफ अंडरटेकींग कायदा १९७० अन्वये झालेली असून, सदर बँक ही बँक ऑफ महाराष्ट्र, तारळे शाखा या नावाने कार्यरत आहे. प्रतिवादी क्रमांक ७ हे उदयोगधंदा, व्यवसाय, व्यापार, वाहन खरेदी, रोजगार, शेती, शैक्षणिक वगैरे कारणांसाठी कर्ज देतात.

०३. प्रतिवादी क्रमांक २ ते ५ ने प्रतिवादी क्रमांक ७ यांचेकडून दिनांक १२.०३.२०१८ रोजी र. रु. १३,४८,०००/– चे गृह कर्ज घेतलेले होते. त्याचा कर्ज खाते क्रमांक ६०३०६९७९३३२ हा आहे. सदर गृहकर्ज घेतेसमयी प्रतिवादी क्रमांक २ व ५ यांनी प्रतिवादी क्रमांक २ हिचे नोंदणीकृत खरेदीपत्र क्रमांक ४५८२/१९९० चे दिनांक २०.१२.१९९० चे दिनांक २०.१२.१९९० अन्वये मालकी प्राप्त झालेले दावा कलम १क ही मिळकत प्रतिवादी क्रमांक ७ कडे नोंदणीकृत तारण गहाण खत क्रमांक ६१९/२०१८ दिनांक २०.०३.२०१८ ने नोंदणीकृत केलेले होते व आहे. त्यानुसार बँक प्रतिवादी क्रमांक ७ यांची बोजाची नोंद दावा कलम १क चे रेकॉर्ड सदरी झालेली होती व आहे. त्याबाबत वादी व प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांना परिपूर्ण भिज्ञाता होती व आहे.

०४. दरम्यानचे काळात सदरचे कर्ज खाते अनुत्पादित (N.P.A) झालेमुळे प्रतिवादी क्रमांक ७ यांनी वादी व प्रतिवादी क्रमांक २ ते ५ विरुध्द Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act 2002 (आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुर्नरचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ SARFAESI Act 2002) अंतर्गत कायदेशिर कार्यवाहीस प्रारंभ केलेला होता व आहे. तद्पश्चात प्रतिवादी क्रमांक २ ते ५ यांचे प्रतिवादी क्रमांक ७ यांचेकडील कर्जखाते अनुत्पादीत झालेपश्चात, प्रतिवादी क्रमांक ७ ने प्रतिवादी क्रमांक २ ते ५ विरुध्द आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुर्नरचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ मधील कलम १३(२) अन्वये दिनांक १३.०२.२०२३ रोजी डिमांड नोटीस दिलेली होती. तद्पश्चात दिनांक ०९.०५.२०२३ रोजी कलम १३(१२) आणि Security Interest Enforcement Rule 2002 मधील नियम ३ प्रमाणे साठ दिवसाची नोटीस देवून व दिनांक ११.०५.२०२३ रोजी फायनान्स एक्सप्रेस व लोकसत्ता या दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीसीद्वारे ताबा निर्देशित नोटीस दिलेली होती व आहे. प्रतिवादी क्रमांक ७ यांनी SARFAESI Act 2002 कलम १४ प्रमाणे जिल्हाधिकारी सातारा यांचेकडून दावा कलम १(क) चा ताबा घेणेबाबत आदेश क्रमांक एम ए जी / ४/ सिक्यु/ एस. आर/११३/२०२३ दिनांक ०७.०८.२०२३ ने अधिकारीत केलेले आहे. त्याबाबत वादी व प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांना संपुर्णतः भिज्ञता होती व आहे.

०५. वस्तुतः सदर प्रतिवादी क्रमांक २ ते ५ यांचे विरुध्द प्रतिवादी क्रमांक ७ यांनी SARFAESI ACT 2002 मधील नमूद तरतुदीनुसार सर्व तत्वांचे पालन करुन आवश्यक कायदेशिर प्रक्रियेचा आरंभ केलेला असलेमुळे, सदरचे दावा मिळकतीबाबत कोणतेही आदेश पारित करणेचे अधिकार मे. न्यायालयास नाहीत. केवळ मे. न्यायालयाची दिशाभुल करुन न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर करुन जनतेचा पैसा लाटणेकरीता कुहेतूने प्रेरित होवून सदरचा दावा वादी व प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांनी संगनमताने दाखल केलेला आहे.

०६. वादीने दावा मिळकतीचे बाबत केलेली मागणी ही कायदेशिरदृष्टया अपूर्ण असून अशी कोणतीही अपूर्ण मागणी मे. न्यायालयासमोर करता येत नाही. वादीने केलेल्या मागणी अन्वये, दावा विषयाची केलेली किंमत ही पूर्णतः चुकीची असून, केवळ आणि केवळ सदरची मागणी ही दावा हरण्याच्या भितीने स्टॅम्प डयूटी वाचवणेकरीता केलेली असून, सदर विषयाची किंमत ही प्रचलित कायदयान्वये बेकायदेशीर असलेमुळे, वादीने सादर केलेली स्टॅम्प डयूटी देखील अपूर्ण आहे. अशा परिस्थितीत सदरचा दावा हा अपु-या मुल्याचा मुद्रांक वादीने दिलेबाबत मे. न्यायालयाने काढून टाकणेत यावा. सदरचा दावा मे. न्यायालयासमोर दाखल करणेस कोणतेही पुरक आवश्यक व कायदेशिरदृष्टया वाचनिय कारण घडलेले नाही. या कारणास्तव सदरचा दावा हा वाद कारण नसल्यामुळे आणि दाव्याला SARFAESI ACT 2002 कायदयाची बाधा असल्यामुळे मे. न्यायालयाने दाव्यातील वादपत्र काढून टाकणेत यावा व प्रतिवादी क्रमांक ७ चा अर्ज मंजूर करणेत यावा, अशी विनंती केली आहे.

## वादीचे कथने थोडक्यात खालीलप्रमाणे –

०७. वादीने नि.क्र.५१ वर म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे. वादी हिने आपल्या मुलाच्या वतीने सदरचा वाटपाचा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रमांक ७ यांनी अर्जातील दावा कलम १ मध्ये बँकेबद्दल दिलेली माहिती वगळता बाकी संपूर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असल्याने, वादीस तो मुळीच मान्य व कबूल नाही. सदरचे कर्ज हे दिनांक १२.०३.२०१८ रोजी काढलेले असून, वादी हिचा विवाह दिनांक २१.०८.२०२० रोजी झालेला आहे. वादी नंबर १ व प्रतिवादी क्रमांक ४ यांच्या विवाह संबंधातून वादी क्रमांक २ गौशिक याचा जन्म झालेला असून, वादी क्रमांक २ हा सदरच्या राहत्या घराचा कायदेशिर वारस असल्याने, त्याच्या सदरच्या प्रॉपर्टीमध्ये असलेला कायदेशिर हिस्सा डावलता येणार नाही. शिवाय सदरच्या कर्जाची कोणतीही पूर्व कल्पना वादीस हिस नव्हती व नाही. कोणाच्याही एकत्र कुटुंबाच्या प्रॉपर्टीमध्ये असलेल्या कायदेशिर हक्क अधिकारांवर कोणतीही बँक गदा आणू शकत नाही. हे बेकायदेशिर असल्याने बँकेला हा अधिकार नसल्याने बँकेने वादीच्या वारसा

हक्कास पायधुळी तुडवण्याचा कोणताही गैरप्रकार करुन गैरकृत्य करु नये.

०८. प्रतिवादी क्रमांक ७ यांनी जी काही कायदेशिर कार्यवाही अर्ज कलम ३ मध्ये प्रारंभ केलेली होती व आहे, ती थांबवावी. शिवाय बँकेने कार्यवाही करुन जर सदरची एकत्र कुटुंबाची प्रॉपर्टी लिलाव करुन विक्री केल्यास वादी क्रमांक १ व २ यांचे आभाळ होऊन त्यांना कायमस्वरुपी बेघर व्हावे लागू शकते. त्यामुळे बँकेने सदरच्या वादी यांचा कुठेही विचार न करता, कार्यवाही चालू केली असल्याने, बँक यांना प्रथमतः वादी यांचा हिस्सा असलेली प्रॉपर्टी वादी यांच्या परवानगी शिवाय, विक्री करण्याचा कोणताही हक्क अधिकार नसल्याने, सदरचे कृत्य हे बेकायदेशिर आहे. तरी बँकेने कार्यवाही करायची झाल्यास, प्रतिवादी क्रमांक १ ते ५ विरुध्द कार्यवाही करण्यास वादी यांची कोणतीच हरकत नाही. परंतु, वादी यांच्या हिश्याच्या प्रापर्टीचा परस्पर कोणताही व्यवहार करण्यास वादी हिची हरकत आहे. याने वादी यांचे कशानेही भरुन न निघणारे नुकसान होऊ शकते.

०९. प्रतिवादी क्रमांक ७ यांनी आपल्या अर्ज कलम ४ मध्ये कर्जाची जाहिर नोटीस लोकसत्ता या वृत्तपत्रामध्ये ताबा नोटीस जाहिर केल्याचे समजताच सदरची वादी हिने यास हरकत घेतलेली असून, प्रतिवादी क्रमांक ७ यांनी वादी यांचा कायदेशिर असलेल्या हिश्याची कोठेही विचार केलेला दिसून येत नाही. प्रतिवादी क्रमांक ७ यांनी कार्यवाही करण्याची झाल्यास, आधी वादी यांचा मालमत्तेमध्ये असलेला हिस्सा वगळता बाकी सर्व प्रॉपर्टीवर कार्यवाही करण्यास वादीची कोणतीही हकरत अडथळा नाही.

१०. बँक यांनी SARFAESI ACT 2002 नुसार वादी हिच्या मुलाचा कायदेशिर शेयर असल्याने, एकत्र कुटुंबाची प्रॉपर्टीचा ताबा घेण्याकरता बँकेने वादी यास पार्टी करणे गरजेचे होते. परंतु, बँकेने कायदेशिर वारस यास पार्टी न केल्याने, त्यांचा हिस्सा वाटणी यावर बँक बेकायदेशिररित्या ताबा मिळवू शकत नाही. शिवाय कर्जाची पहिली नोटीस दिनांक १३.०२.२०२३ रोजी दिलेली होती. यावेळी वादी क्रमांक १ व २ मालमत्तेमध्येच रहिवाशी होते. तसेच, आज तागायत वादी यांच्या बेडरुमचा ताबा हा

वादी हिच्याकडेच असून, तिचे व बाळाचे सर्व साहित्य त्याच रुममध्ये असून, सदरच्या रुमच्या लॉकची चावी वादी हिच्याकडे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना याबद्दल ऑब्जेक्शन घेता येवू शकत नाही. शिवाय वादी व प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांच्यामध्ये कायदेशिर वाद हे अगदी गेले दिड वर्षे चालू असून त्याचे सर्व रेकॉर्ड मे. कौटुंबिक न्यायालय, सातारा, पाटण, कराड येथे उपलब्ध असल्याने, यात कायदेशिर हक्क अधिकार असल्याने, वादी हिने हरकत घेतलेली आहे. अन्यथा घेतली नसती कारण वादी हे या मालमत्तेचे कायदेशिर वारस असल्यानेच त्यांनी वाटपाचा दावा दाखल केलेला असून, फक्त मालमत्ता क्रमांक ७२० वरच नाही तर इतर तारळे, कडवे, काटेवाडी इत्यादी सर्वच मालमत्तेवरील आपला कायदेशिर हिस्सा मागण्या करता, वाटपाचा दावा वादीने मे. न्यायालयात केलेला आहे.

११. प्रतिवादी क्रमांक ७ यांचे जे काही कर्ज असेल ते प्रतिवादी क्रमांक २ ते ५ यांच्या वैयक्तिक स्वमालकीच्या प्रॉपर्टीमधून वसुल करण्यास वादी क्रमांक १ व २ यांची कोणतीच हरकत नाही. परंतु, याकरीता प्रतिवादी क्रमांक २ ते ५ यांच्या ज्या काही स्वमालकीच्या वैयक्तिक मालमत्ता असतील यातून कर्ज वसुल करावे. परंतु, मालमत्ता क्रमांक ७२० ही मालमत्ता एकत्रित कुटुंबाची असल्याने यास प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीचा वैयक्तिक हिस्सा असल्याने सामाईकातील कोणतीच प्रापर्टी ही कोणत्या एका कुटुंबातील व्यक्तीला विक्री करता येत नाही. याकरीता सर्व हिस्सेदारांची परवानगी अत्यावश्यक असते. तरी बँकेला कारवाई करायची झाल्यास वादीच्या हिश्यास बँकेला अशी बेकायदेशिर कारवाई करता येवू शकत नाही. प्रतिवादी क्रमांक ७ यांचा सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली.

**<u>कागदपत्रे-</u>**

१२. प्रतिवादी क्रमांक ७ यांनी नि.क्र.४४ई लगत कागदयादीने कागदपत्रे दाखल केलेले आहेत. नोंदणीकृत तारण गहाण खत ६१९/२०१८ ची प्रत, SARFAESI Act कलम १३(२) अंतर्गत पाठवलेली नोटीस, SARFAESI Act नुसार घेतलेली ताब्याची नोटीस, फायनान्स एक्सप्रेस मध्ये प्रसारित केलेली जाहिर नोटीस,

दैनिक लोकसत्ता मध्ये प्रसारित केलेली जाहिर नोटीस, जिल्हा दंडाधिकारी सातारा यांनी SARFAESI Act कलम १४ प्रमाणे केलेले आदेश प्रत, अधिकारपत्राची छायांकीत प्रत दाखल केली आहे.

१३. वादीने नि.क्र.०३ लगत दावा कलम १क घर मिळकत मालमत्ता क्रमांक ७२० चा नमुना आठचा उतारा दाखल केला आहे.

**<u>युक्तिवाद -</u>**

१४. प्रतिवादी क्रमांक ७ तर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. कोळेकर यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्रमांक ७ ही राष्ट्रीयीकृत बॅंक आहे. प्रतिवादी क्रमांक २ ते ५ यांनी प्रतिवादी क्रमांक ७ यांच्या कडून दिनांक १२.०३.२०१८ रोजी र. रु. १३,४८,०००/- चे गृह कर्ज घेतलेले होते. त्यावेळेस प्रतिवादी क्रमांक २ हिचे नोंदणीकृत खरेदी पत्र क्रमांक ४५८२/१९९० दिनांक २०.१२.१९९० अन्वये मालकी प्राप्त झालेली दावा कलम १ क ही मिळकत प्रतिवादी क्रमांक ७ कडे नोंदणीकृत तारण गहाण खत क्रमांक ६१९/२०१८ दिनांक २०.०३.२०१८ रोजी नोंदणीकृत केले होते व त्यानुसार प्रतिवादी क्रमांक ७ यांची बोजाची नोंद दावा कलम १क चे रेकॉर्ड सदरी झालेली होती व आहे. प्रतिवादी क्रमांक २ ते ५ चे कर्ज खाते अनुत्पादित झाल्यामुळे प्रतिवादी क्रमांक ७ यांनी प्रतिवादी क्रमांक २ ते ५ विरुध्द Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 अंतर्गत कायदेशिर कारवाई प्रारंभ केली होती व आहे. त्यामुळे वादीने दाखल केलेला दावा याला कोणतेही कारण घडलेले नसताना want of cause of action ची बाधा येत आहे व plaint to be barred by law प्रमाणे वादीचा दावा काढून टाकणेत यावा, असा युक्तिवाद केला.

१५. प्रतिवादी क्रमांक ७ यांनी नि.क्र.५३ लगत खालीलप्रमाणे केस लॉ दाखल केले आहेत.

1. Hon'ble Supreme Court in case of Jagdish Singh Vrs. Heeralal and Others, reported in 2013 C J (SC) 1212. It is held that -

*"19. Section 34 of the Securitisation Act ousts the civil court jurisdiction. For easy reference,we may extract Section 34 of the securitisation Act, which is as follow:*

*Section 34. Civil Court not to have jurisdiction – No civil court shall have jurisdiction to entertain any suit or proceeding in respect of any matter which a Debts Recovery Tribunal or the Appellate Tribunal is empowered by or under this Act to determine and no injunction shall be granted by any court or other authority in respect of any action taken or to be taken or to be taken in pursuance of any power conferred by or under this Act or under th*e Recovery of Debts Due to Banks and Financial Institutions Act, 1993 (51 of 1993).

***20.*** *The scope of Section 34 came up for consideration before this Court in Mardia Chemicals Ltd. Supra and this Court held as follow :*

*50. It has also been submitted that an appeal is entertain able before the Debts Recovery Tribunal only after such measures as provided in Sub section (4) of Section 13 are taken and Section 34 bars to entertain any proceeding in respect of a matter which the Debts Recovery Tribunal or the Appellate Tribunal is empowered to determine. Thus before any action or measure is taken under Sub-section (4) of Section 13, it is submitted by Mr. Salve, one of the counsel for the Respondents that there would be no bar to approach the civil court. Therefore, it cannot be said that no remedy is available to the borrowers. We, however, find that this contention as advanced by Shri Salve is not correct. A full reading of Section 34 shows that the jurisdiction of the civil court is barred in respect of matters which a Debts Recovery Tribunal or an Appellate Tribunal is empowered to determine in respect of any action taken "or to be taken in pursuance of any power conferred under this Act". That is to say, the prohibition covers even matters which can be taken cognizance of by the Debts Recovery Tribunal though*

*no measure in that direction has so far been taken under Sub-section (4) of Section 13. It is further to be noted that the bar of jurisdiction is in respect of a proceeding which matter may be taken to the Tribunal. Therefore, any matter in respect of which an action may be taken even later on, the civil court shall have no jurisdiction to entertain any proceeding thereof. The bar of civil court thus applies to all such matters which may be taken cognizance of by the Debts Recovery Tribunal, apart from those matters in which measures have already been taken under Sub-section (4) of Section 13.*

***23.*** *We are of the view that the civil court jurisdiction is completely barred, so far as the "measure" taken by a secured creditor under Sub-section (4) of Section 13 of the Securitization Act, against which an aggrieved person has a right of appeal before the DRT or the Appellate Tribunal. To determine as to whether there has been any illegality in the "measures" taken. The bank, in the instant case, has proceeded only against secured assets of the borrowers on which no rights of Respondent Nos. 6 to 8 have been crystalised, before creating security interest in respect of the secured assets".*

02. Hon'ble Bombay High Court, Nagpur Bench, in case of Bank of Baroda Vrs. Paramount Conductors Ltd., in Civil Revision Application No. 173 of 2018 decided on 14 November, 2019. It is held that -

*"20. In the present case, the nature of grievances sought to be raised by the respondent could have been agitated only under Section 17 of the Securitization Act, which under Section 17(3) of the said Act has the power to grant relief to the respondent if the respondent proves that the action undertaken by the applicant-Bank was not in consonance with the provisions of the Securitization Act and the Rules framed thereunder."*

१६. वादी विधीज्ञ श्रीमती गौरी कदम यांनी युक्तिवाद केला की, वादी हिने तिच्या मुलाच्या वतीने वाटपाचा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्रमांक ७ यांचे जे काही कर्ज असेल ते प्रतिवादी क्रमांक २ व ५ यांच्या वैयक्तिक स्वमालकीच्या प्रॉपर्टीमधून वसुल करणेस वादी क्रमांक १ व २ यांची कोणतीच हरकत नाही. परंतु, मालमत्ता क्रमांक ७२० दावा कलम १क ही मालमत्ता एकत्रीत कुटुंबाची असल्याने व कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचा वैयक्तिक हिस्सा असलयाने सामाईकांतील मालमत्ता ही विक्री करता येत नाही व बँकेला तशी बेकायदेशीर कारवाई करता येवू शकत नाही. वादीचा हिस्सा सोडून बँकेने त्यांची कारवाई करणेस वादीस कोणतीच हरकत नाही. प्रतिवादी क्रमांक ७ यांचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा, असा युक्तिवाद केला.

१७. प्रतिवादी क्रमांक ७ तर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. कोळेकर व वादी विधीज्ञ श्रीमती गौरी कदम यांचा युक्तिवाद ऐकला.

१८. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्रमांक ७ ही बँक ऑफ महाराष्ट्र आहे. प्रतिवादी क्रमांक ७ बँकेच्या कथनानुसार ''दिनांक १२.०३.२०१८ रोजी र. रु. १३,४८,०००/– चे गृहकर्ज प्रतिवादी क्रमांक २ व ५ यांनी घेतलेले होते, त्याकरीता प्रतिवादी क्रमांक २ व ५ यांनी प्रतिवादी क्रमांक २ हिचे नोंदणीकृत खरेदीपत्र क्रमांक ४५८२/१९९० चे दिनांक २०.१२.१९९० अन्वये मालकी प्राप्त झालेले दावा कलम १ क मालमत्ता क्रमांक ७२० ही मिळकत प्रतिवादी क्रमांक ७ बँकेकडे नोंदणीकृत तारण गहाण खत क्रमांक ६१९/२०१८ दिनांक २०.०३.२०१८ रोजी नोंदणीकृत केलेले होते व आहे, प्रतिवादी क्रमांक ७ यांच्या बोजाची नोंद दावा कलम १ चे रेकॉर्ड सदरी झालेली होती व आहे, प्रतिवादी क्रमांक ७ यांनी वादी व प्रतिवादी क्रमांक २ ते ५ विरुध्द SARFAESI ACT 2002 अंतर्गत कायदेशिर कारवाईस प्रारंभ केला होता व आहे,'' असे प्रतिवादी क्रमांक ७ बँकेने कथन केले आहे.

१९. बँकेने दावा कलम १क घर मिळकत मालमत्ता क्रमांक ७२० वर तारण गहाण ६१९/२०१८ ची प्रत दाखल केलेली आहे. तसेच, दावा कलम १ क घर

मिळकत मालमत्ता क्रमांक ७२० च्या गाव नमुना आठ यावर प्रतिवादी क्रमांक ७ यांचे बोजा चढवल्याचे दिसून येत आहे. Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 (आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुर्नरचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ SARFAESI Act 2002) चे कलम ३४ नुसार दिवाणी न्यायालयाला अधिकारक्षेत्राची बाधा येते. तसेच, प्रतिवादी क्रमांक ७ यांनी Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 (आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुर्नरचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ SARFAESI Act 2002) या कायदया अंतर्गत कारवाई सुरु केली असल्याचे दिसून येत आहे. SARFAESI ACT 2002 अंतर्गत प्रतिवादी क्रमांक ७ बँक यांना कायदेशिर कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार आहे, असे दिसून येते. प्रतिवादी क्रमांक ७ यांनी वर नमूद दाखल केलेले केस लॉ मधील गृहितके सदर प्रकरणाला लागू होत असल्याचे दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश VII नियम ११ (ड) प्रमाणे वादीचे दाव्याचे वादपत्र फक्त प्रतिवादी क्रमांक ७ विरुध्द फेटाळणे न्यायोचित होणार आहे. त्याकरीता आदेश -

## आदेश

१. प्रतिवादी क्रमांक ७ चा नि.क्र.४४ वरील अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो.

२. दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश VII नियम ११(ड) प्रमाणे वादीचे दाव्याचे वादपत्र प्रतिवादी क्रमांक ७ विरुध्द फेटाळणेत येते.

३. दोन्ही पक्षांनी आदेशाची नोंद घ्यावी. .

ठिकाण – पाटण, जिल्हा सातारा.
दि.१०.०४.२०२४.

(चेतना य. नेवारे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
पाटण